कर्नाटक सरकार

परिसर अध्ययन

ENVIRONMENTAL STUDIES

अभ्याससहित पाठ्यपुस्तक

TEXT CUM WORK BOOK

(REVISED)

मराठी माध्यम

MARATHI MEDIUM

PART - 2

3

इयत्ता तिसरी

THIRD STANDARD

Karnataka Text Book Society (R.)
6th Cross, Malleshwaram,
Bengaluru - 560 003.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अनुक्रमणिका

C2U9X4

पाठ क्र.	पाठ	पृष्ठ संख्या
13.	सुविधा आमच्यासाठी	1 - 9
14.	वाहतुकीची साधने	10 - 16
15.	संपर्क पत्राद्वारे	17 - 25
16.	दिपाच्या घराण्याची वंशावळ	26 - 31
17.	माझा छंद	32 - 38
18.	हे देखील आपल्या सारखेच	39 - 43
19.	सण आणि जत्रा	44 - 49
20.	माझा एक दिवस	50 - 56
21.	लंपडाव - एक खेळ	57 - 65
22.	एका मडक्याची गोष्ट	66 - 70
23.	पृथ्वी - आपले घर	71 - 83
24.	नकाशा	84 - 87
25.	माझा जिल्हा - तुझा जिल्हा	88 - 102

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 13

सुविधा आमच्यासाठी

J6A8K1

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- सार्वजनिक सुविधांचे महत्व ओळखशील आणि त्यांचे रक्षण करशील.

त्या दिवशी शाळेतील सर्व मुलांचा आपल्या शहरातील विविध स्थळांना भेट देण्याच्या कार्यक्रम होता. सर्व मुले आनंदात होती. सर्वजण शाळेला वेळेच्या आधीच पोहोचली. बस वेळेवर आली. रांगेतून येऊन सर्वजण बसमध्ये बसले. बस निघाली. प्रथम बस वाचनालयाजवळ थांबली.



मुलांनी सूचना फलक काळजीपूर्वक वाचले. वाचनालय शांतपणे फिरुन पाहिले. त्यांनी काही पुस्तके घेतली. काही वेळ वाचून परत जागेवर ठेवली. वाचनालयातून बाहेर येऊन बसमध्ये बसली.

वाचनालयातील फलक वाचा. असे का लिहीले आहे ?

तुम्ही कधी वाचनालय पाहिलय का?


तुम्ही तिथे कोणते नियम पाळले? ते लिहा.

_____

_____

वाचनालयाला भेट द्यायची सवय करून घ्या.

बस येऊन बस स्थानकावर थांबली. सर्व मुले खाली उतरली. ती सर्व बसस्थानकावर फिरु लागली.



कोणी तरी नळ बंद केलेला नाही नळ चालूच आहे, पाणी वाया जात आहे. नळ बंद करतो.

उघड्यावर कापून ठेवलेली फळे खाल्याने रोग प्रसार होतो हे तुम्हाला माहीत आहे का? ती झाकून ठेवा.

लोक कचरा डब्याच्या बाहेर टाकतात. हे आपले बस स्थानक आहे ते आपण स्वच्छ ठेवले पाहिजे.

बस स्थानक स्वच्छ ठेवण्यासाठी मुलांनी सहकार्य कसे केले?

_____

_____

_____

तुमच्या गावातील बस स्थानक कसे आहे?

_____

_____

_____

त्यानंतर मुले बसमध्ये बसून इस्पितळाजवळ उतरली.



सर्वांनी इस्पितळात चालणाऱ्या कामाची पहाणी केली. त्यांनी इस्पितळातून बाहेर पडताना ते किती स्वच्छ आहे याचा विचार करत बसमध्ये येऊन बसली.


तुझ्या नजिकच्या इस्पितळाला भेट दे. तेथे स्वच्छता आहे का? निरीक्षण कर व लिही.

_____

_____

बस उद्यानासमोर येऊन थांबली. मुलाना खूप आनंद झाला.

हे तुमचे उद्यान आहे. ते स्वच्छ ठेवा.



सायंकाळ होईपर्यंत ती उद्यानात खेळली. ती दमली होती. ती बसमध्ये बसली आणि शाळेकडे परत आली. तुम्ही पाहिलेले उद्यान कसे होते? दोन ओळीत लिहा.

_____

_____

दुसऱ्या दिवशी शिक्षकानी मुलांना काही प्रश्न विचारले. त्यांच्यासोबत तुम्ही पण गेला होतात ना? खालील प्रश्नांची उत्तर लिहा.

1. तू पाहिलेल्या स्थळांची नावे लिही.

_____

_____

NOT FOR SALE BSTB REPUBLISHED

2. त्यातील कोणते स्थळ आवडले? कारण काय?


3. वाचनालय, इस्पितळ, बसस्थानक, उद्यान ही सार्वजनिक सुविधापैकी आहेत? त्यांचा वापर कोण करते?

4. आम्ही वापरत असलेल्या या सार्वजनिक सुविधांची आम्हाला काय गरज आहे?


5. सार्वजनिक ठिकाणांचे रक्षण कोण करते? जाणून घेऊन लिही.

@KTDS
NOT TO BE REPUBLISHED


या चित्रात दिसणाऱ्या सार्वजनिक सुविधांची नावे व त्यांची आवश्यकता बाजूला दिलेल्या जागेत लिही.




















© @KTBS
NOT TO BE REPUBLISHED














@KTBS
NOT TO BE REPUBLISHED


खालील चित्र पहा. त्या संदर्भात तू काय करशील ते लिही.











@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या परिसरातील सार्वजनिक सुविधांची यादी कर.

शाळा सार्वजनिक सुविधा पैकी एक आहे, का ते लिही.

तू आणि तुझे मित्र शाळा कशी स्वच्छ ठेवता ?

कृती : खालील शब्दकोड्यात काही सार्वजनिक सुविधांची नावे दिली आहेत. ती ओळखा आणि त्या सभोवती गोल करा. खालील उदाहरणांचे निरीक्षण करा.

पो	ष्ट	प	थ	दी	प	हि	र	वा	ई	दु	घ	पा	र	दु
र	घ	ट	कि	ल	बी	ल	पा	ल	पी	का	र	स्ते	स्या	घ
घ	प	ट	व	सा	सा	र्व	ज	नि	क	न	ळ	म	क	रा
रा	पो	ष्ट	ऑ	फी	स	रा	स्व	स्त	दु	का	न	हा	डे	स
स	र	ब	ट	की	शा	ळा	स्त	ह	वा	पा	णी	मा	ची	मो
मो	र	स	पा	ब	गि	चा	धा	वा	च	ळ	स	र्ग	झा	री
री	घ	व	ल	बा	ग	घ	न्य	पा	ना	प	ळ	वृ	डे	ल
ल	स	प	ड	उ	म	र	दु	ट	ल	घ	बा	क्ष	ह	बा
प	ळा	ए	खा	द्या	म	का	का	रा	य	व	जा	ग	ब	ग
घ	रा	ती	ल	न	ळ	म	न	जा	ग	घ	र	चे	दि	वे

- सार्वजनिक सुविधा ओळख आणि त्याच्या भोवती गोल कर.

शाळा, दुकान, घर, वाचनालय, कार, बस, रस्त्याकडेची झाडे, घरचे दिवे, रस्त्यावरील दिवे (पथदिप), उद्यान, रस्ते, घरातील नळ, सार्वजनिक नळ, घरासमोरील बाग, पोष्ट ऑफीस, बाजार, स्वस्तधान्य दुकान.

NOT TO BE REPUBLISHED © BALBHARATI

पाठ 14

वाहतुकीची साधने

M3V5G4

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- प्रवासाची आवश्यकता ओळखशील.
- जवळचा, दुरचा प्रवास करण्याची आणि आधुनिक पध्दतीची वाहतूकीची साधने ओळखशील.
- बस स्थानक/रेल्वे स्थानकावर विविध प्रकारचे कार्य करणाऱ्या कामगारांबद्दल जाणून घेशील.

गा आणि आनंद लुटा

चालली हो चालली, आमची सहल चालली,
येता जाता आम्हाला, विविध वाहने ही दिसली. ॥ध्रु॥

बैलगाडी, घोडागाडी, रिक्षा आणि कार,
पहाताक्षणी मनी आले, त्यात बसण्याचे विचार.॥1॥

रेल्वे कशी धावते पहा, वेगात रुळावरुन,
बोट कशी जाते पहा, हळूहळू पाण्यावरुन. ॥2॥

विमान पहा उडत जाते, आकाशामधून,
पहाताना मजा वाटे, आम्हा जमिनीवरून. ॥3॥

मला आता वाटते, सायकल किंवा दुचाकी घ्यावे,
गाणे म्हणत म्हणत, साऱ्या जगात फिरावे.॥4॥

© KSBSE NOT TO BE REPUBLISHED

ह्या कवितेत आलेल्या वाहनांची नावे लिही.

वाहनांची चित्रे जमा करुन त्यांना येथे चिकटव.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

तू कोणकोणत्या वाहनातून प्रवास केला आहेस. त्या वाहनांची नावे लिही.

यादी केलेल्या वाहनांचे वेगाने जाणारी वाहने आणि हळू जाणारी वाहने असे वर्गीकरण कर.

वेगाने जाणारी वाहने	हळू जाणारी वाहने

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या परिसरात सामानाची वाहतूक करण्यासाठी कोण कोणती वाहने वापरतात ? त्यांची नावे लिही.

कृती : रिकाम्या जागा भरुन वाच.

आम्ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करण्यासाठी _____ व _____ चा वापर करतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सामानाची ने आण करण्यासाठी _____ आणि _____ यांचा वापर करतो. आरामदायक व दुरचा प्रवास करण्यासाठी _____ हे उत्तम. वेगाने प्रवास करण्यासाठी _____ चा वापर करतात. _____ चा वापर वाळवंटातील प्रवासासाठी करतात. त्याला वाळवंटातील जहाज असे म्हणतात. _____ चा वापर नदी ओलांडण्यासाठी करतात.



© BOKTBS NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या गावातील बस स्थानकावर तू काय काय पाहिलास ते लिही.

_____

_____

_____

_____

कृती : तू पाहिलेल्या 2 वाहनांची चित्रे काढून ती रंगव.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

रेल्वे स्थानक



तुझ्या गावात रेल्वे स्थानक आहे का?

तू रेल्वे स्थानक पाहिले आहेस का?

तू कधी रेल्वेतून प्रवास केला आहेस का?

हे तू स्वतः कर:

रिकाम्या काड्याच्या पेट्या, शितपेयांच्या बाटल्यांची झाकणे यांचा वापर करुन घरातील वडीलधाऱ्यांची मदत घेऊन रेल्वे गाडीचा नमुना तयार कर.

जाणून घे.

रेल्वे स्थानक, बस स्थानक या ठिकाणी विविध काम करण्यासाठी कामगारांची गरज असते. आमचा प्रवास सुखकारक होण्यासाठी त्यांचे सहकार्य आवश्यक आहे.

© NOT TO BE REPUBLISHED

चित्रांचे निरीक्षण कर. हे लोक कोणते काम करत आहेत? चित्राच्या बाजूला दिलेल्या जागेत लिही.



_____




_____



_____



_____



_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


पाठ 15

संपर्क पत्राद्वारे

Q1G2C7

या पाठाच्या अध्ययनंतर तू,

- भाषेचा वापर न करता खुणा अथवा अभिनयाद्वारे संवाद साधशील.
- पत्राद्वारे संपर्क साधणे आणि पोष्ट ऑफीसचे कार्य कसे चालते ते समजून घेशील.



© BOKTBS NOT TO BE REPUBLISHED

तो मे महिना होता. शाळेला सुट्टी होती. संजयच्या घरी टी.व्ही. वर लागलेला क्रिकेटचा सामना पाहण्यासाठी काही मुले जमली होती. सामना अगदी रंगात आला होता. राहुल द्रविड बॅटींग करत होता. हरभजसिंगने टाकलेला चेंडू -द्रविडने बॅट उचलून जोरात मारला. चेंडू सिमापार गेला. टी.व्ही. पहाणाऱ्या मुलांनी जोरात टाळ्या वाजविल्या आणि आनंद व्यक्त केला. त्यावेळी छोट्या संजयने टी.व्ही. वर दिसणाऱ्या पंचाने हाताने केलेली खूण पाहिली.

संजय : सुनिलदादा, त्या माणसाने दोन्ही हात वर का केले?

सुनिल : अरे, चेंडू सिमारेषेच्या बाहेर गेला म्हणजे सहा धावा झाल्या हे दाखविण्यासाठी त्या पंचाने तशी खूण केली.

संजय : हे बोलून सांगता आल असत ना?

उमा : ह्या एवढ्या मोठ्या मैदानावर, लोकांच्या गोंगाटात काहीही ऐकायला येत नाही. त्यामुळे खूणा करुन सांगणे सोपे. सगळ्यांना समजते.

लुसी : काल रात्री आम्ही जेवणासाठी एका हॉटेलमध्ये गेलो होतो. तिथे मी लोकांना खुणा करुन चपाती आण, भात आण असे सांगताना पाहिले. ते पाहताना मला मजा वाटत होती.

सलमान : होय, जिथे आपल्याला भाषा समजत नाही. आपण दूरवर असताना अथवा गोंगाट जास्त असतो त्या ठिकाणी खुणा करणे उपयोगी पडते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती :

- न बोलता फक्त खुणावाटे तुझ्या मित्र/मैत्रिणीशी संवाद साध.
- बोलावणे, लिहिणे, गाणे म्हणणे, जेवण करणे, वस्तू आण म्हणणे, हवे-नको हे दर्शविणे, वर-खाली दर्शविणे, इथे-तिथे दर्शविणे, पाणी पिणे ह्या कृती तू खुणा करुन दाखव. तुझ्या खुणा ओळखण्यास तुझ्या मित्र/मैत्रिणिंना सांग.
- तू कधी क्रिकेटचा अथवा फुटबॉलचा सामना पाहिला आहेस का? ह्या सामन्यात दर्शविल्या जाणाऱ्या दोन खुणांची ओळख तुझ्या मित्रांना करुन दे.

उदाहरणार्थ: क्रिकेटच्या सामन्यात एक हात वर करुन अंगठ्याच्या बाजूचे (तर्जनी) बोट वर केले असेल तर त्याचा अर्थ खेळाडू **आऊट** झाला.

गा आणि आनंद लुटा

भाषा नको, गाव नको,
खुणा फक्त जाणून घे.
अंतर असो, गोंगाट असो,
खुणांचा वापर तू करून घे.

रमेश : ओ हो! द्रविडने किती छान शतक पूर्ण केले.

करुणा : मला द्रविड खूप आवडतो.

सुनिल : मला सुद्धा द्रविड खूप आवडतो. त्याने शतक पूर्ण केल्याबद्दल आपण त्याला अभिनंदनाचे पत्र लिहूया.

सर्वजण : छान! तसेच करुया.

करुणा : मी लिहिते, तुम्ही मी काय लिहावे ते सांगा.

उमा : ठीक आहे. तुझे अक्षर देखील छान आहे.

करुणा : कोणाकडे पोष्ट कार्ड आहे?

रिता : आमच्या घरी आहे. आताच आणते. जेवणाच्या सुट्टीत लिहूया.
(जेवणाची सुट्टी झाली. क्रिकेटचा खेळ थांबला.)

सुनिल : करुणा पत्र लिहायला सुरु कर. काय लिहायचे ते मी सांगतो.

स्थळ: रामनगर
दिनांक :23-05-2014

प्रिय, राहुल द्रविडदादाला,

सप्रेम नमस्कार

आम्ही इयता तिसरीचे विद्यार्थी आहोत. आम्हा सर्वांना तुम्ही खूप आवडता. तुमची फलंदाजी फारच छान असते. तुम्ही शतक पूर्ण केल्याबद्दल तुमचे अभिनंदन.

कळावे;

आपले शुभचिंतक इयता तिसरीचे विद्यार्थी.

_____


_____

NOT TO BE @RTES REPUBLISHED

संजय : द्रविडचा पत्ता माहीत आहे का?

सलमान : माझ्या वडिलाकडे आहे. मी आताच घेऊन येतो.

करुणा : मी पत्ता लिहू?



उमा : आमचा पता येथे लिही.

रिता : हे पहा पत्र लिहून पूर्ण झाले. हे पत्र द्रविडला कसे पाठायचे?

सुनिल : हे पत्र आपण पोष्टाच्या पेटीत घालूया.

करुणा : अरे, पण हे पत्र द्रविडला कसे पोहोचणार?

सलमान : पोष्ट ऑफीस येथे जवळच आहे. तिथेच पोष्टाची पेटी आहे. आम्ही पोष्ट ऑफीसला जाऊ आणि पोष्टाच्या पेटीत पत्र घालू. त्यानंतर पोष्टमनला विचारु. हे पत्र द्रविडला कसे पोहोचेल.
(सर्वजण मोठ्याने गप्पा मारत पोष्ट ऑफीसकडे जातात.)


उमा : करुणा ते पत्र आता त्या पोष्टाच्या पेटीत घाल.

करुणा : हे घातले.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुनिल : (अरे! तिथे पहा. त्या पोष्टाच्या पेटीतील पत्रे कोणीतरी काढत आहे.) कृपया आम्हाला सांगाल का, तुम्ही ही पत्र का घेत आहात? आम्ही द्रविडला पत्र लिहून या पेटीत टाकल आहे. जर तुम्ही ही पत्र घेतलात तर, ते पत्र द्रविडला कसे पोहोचेल?

पोष्टमन : काळजी करु नका, मी पोष्टमन आहे. दररोज अनेक लोक या पेटीत पत्र टाकतात. मी ती पत्रे पोष्ट ऑफीसमध्ये घेऊन जातो. कृपया तुम्ही सारे आत या आणि इथे कसे काम चालते ते समजून घ्या.







पहा, हे तुमचे द्रविडचे पत्र. आता त्यावर शिक्का मारत आहेत. ही सारी पत्र बेंगळूरला जाणारी आहेत. आम्ही ती रेल्वेने पाठवितो. बेंगळूरमध्ये ती पोष्ट ऑफीसमध्ये नेली जातात. तिथे ती पत्त्यानुसार वेगवेगळी केली जातात. त्या भागाचा पोष्टमन ती पत्रे घेऊन त्या संबधीत व्यक्तीच्या घरी पोहोचवतो.

सुनिल : काका, हे पत्र द्रविडला कधी मिळणार?

पोष्टमन : तीन दिवस लागतील.

संजय : अरे! उद्याच का नाही पोहोचणार ?

पोष्टमन : हे पहा, आमच्याकडे **स्पीड पोष्ट** म्हणून सुविधा आहे. त्या ठिकाणी हे पत्र दिले तर हे पत्र विमानाने पाठविले जाते. त्यासाठी जास्त खर्च येतो, परंतु ते जलद पोहोचते. पोष्ट ऑफीस शिवाय आणखी काही संस्था स्पीड पोष्ट सेवा देतात. तुम्ही **कुरीयर** सेवेबाबत ऐकला आहे का?

रिता : ओहो!... काही दिवसापूर्वी माझ्या आजीने मला माझ्या वाढदिवसासाठी पैसे पाठविले होते. पोष्टमनने ते मला दिले.

पोष्टमन : ती मनिऑर्डर. जसे पत्र एका गावाहून दुसऱ्या गावाला पाठवितात तसेच पोष्टामार्फत पैसे ही पाठविले जातात. तसेच पुस्तके व इतर वस्तू देखील पाठविता येतात त्याला 'पार्सल' म्हणतात.

सुनिल : काका हे पत्र द्रविडला तीन दिवसात मिळेल ना?

पोष्टमन : होय बाळांनो, काळजी करू नका.

करूणा : जेवणाची सुट्टी संपून पुन्हा सामना सुरु झाला असेल. चला आपण टी. व्ही. पहायला जाऊ.

(मुले आनंदाने पोष्ट ऑफीसमधून बाहेर येऊन घरी टी.व्ही. बघत बसतात.)

लोक पत्र का लिहीतात?

© KRSP NOT TO BE REPUBLISHED

तू कधी कोणाला पत्र लिहिले आहेस का ? जर होय. तर, कोणाला आणि का लिहीले ?

_____

_____

_____

कृती : तुझ्या मित्राला / मैत्रिणिला / आजी, आजोबा / प्रिय व्यक्तीला पत्र लिही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे तू स्वतः कर:

तुझ्या गावातील पोष्ट ऑफीसला जाऊन तू लिहिलेले पत्र पोष्ट पेटीत घाल. त्यानंतर पोष्ट ऑफीसमध्ये जाऊन तेथे चालणारे कार्य बघ.

तू भेट दिलेल्या पोष्ट ऑफीसबद्दल माहिती लिही.

_____

_____


_____

_____

_____


खालील चित्रांचे निरीक्षण कर. यात पत्र पाठविण्याची कृती दर्शविली आहे. त्यातील प्रत्येक कृतीला योग्य क्रम दे. एक दिलेले उदाहरण पहा.








1








@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे तूस्वतः कर :

पांढऱ्या कागदापासून लखोटा तयार करणे.



तुझ्या मित्राला/मैत्रिणिला पत्र लिही. ते पत्र तू तयार केलेल्या लखोट्यात घाल. तो चिकटव. त्यावर पाच रुपयांचे पोष्टाचे तिकीट चिकटव. त्यावर मित्राचा/मैत्रिणिचा पत्ता लिही आणि मागील बाजूला तुझा पत्ता लिहून ते पत्र पोष्ट पेटीत टाक.

पोष्टाचे तिकीट त्या लखोट्यावर लावले नाही तर काय होईल? तुझ्या वडीलधाऱ्यांना किंवा शिक्षकांना विचार.

कृती : प्रसिद्ध व्यक्ती, प्राणी, वनस्पती, इत्यादींची प्रसिद्ध केलेली पोष्टाची विशेष तिकीटे तू पाहिली असशील. अशा प्रकारची तिकीटे संग्रह करण्याचा छंद जोपास. अशी तिकीटे एका कोऱ्या कागदावर चिकटव व त्याबद्दल काही वाक्ये लिही.

@MSTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 16

दिपाच्या घराण्याची वंशावळ

P6N8B7

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- तीन पिढ्यांच्या सदस्यांच्या संबंधाची जाणीव करुन घेतील. सोपा वंशवृक्ष रेखाटशील.
- कुटूंबातील सदस्यातील शारीरिक साम्य आणि अनुवांशिक लक्षणातील समानता ओळखशील.
- आई आणि बाळ यांच्या संबंधाची जाणीव होईल.

राजू आणि दिपा उन्हाळयाच्या सुट्टीत आपल्या आजी आजोबाकडे आले. एके दिवशी राजु, दिपा, त्यांची आई आणि आजी सारे मिळून जवळच्या खेड्यात एका बारश्याच्या कार्यक्रमाला गेले. तिथे अनेक लोक जमले होते. दिपाने पाळण्यात झोपवलेल्या बाळाला पाहिले.

दिपा : आई, हे बाळ कोणाचे?

आई : दिपा, ते बाळ राधा आणि राजीव यांचे आहे. तू लहान बाळ असताना, तू देखील पाळण्यात झोपत होतीस.




© KTDS NOT TO BE REPUBLISHED


पाळण्यात असलेले बाळ रडू लागले. राधाने आपल्या बाळाला उचलून घेतले आणि अंगाई गीत गाऊ लागली.

बाळा तुझे ओठ कसे पोवळे ग जणू,
कोरीव भुवया तुझ्या जशी चंद्रकोर जणू.
डोळ्यातील चमक तुझ्या सर्वजण पहाती,
त्यांना वाटे शिवाची आयुधेच चमकती.

कृती : राधाने आपल्या बाळाला कसे शांत केले याचा अभिनय करुन दाखव.
तुला अशी अंगाई गीते माहीत आहेत का? गाऊन दाखव.
तुझ्या घरातील मोठयांकडून किंवा शिक्षकाकडून आणखीन अंगाई गीत शिक.

ही चित्रे पहा. आई आपल्या बाळाला कशी मदत करते ते.






© SCERT NOT TO BE REPUBLISHED

वरील सर्व प्रसंगात आई आपल्या पिल्लांच्या अथवा बाळाला आवश्यक प्रेम, संगोपन, रक्षण, आहार इत्यादी गरजा पूर्ण करते.

बारश्याहून परत येत असताना आजीच्या काही मैत्रिणी भेटल्या. त्यांनी राजूला पाहिले आणि म्हणाल्या, ''हा अगदी त्याच्या आजोबासारखा दिसतो. त्याचे डोळे, रुंद मोठे कपाळ, लांब, नाक, थेट अगदी आजोबाच''. दिपा म्हणाली, सगळेजण सांगतात मी आईसारखी आहे. माझे केस कुरळे आहेत, माझ्या आईचे केससुध्दा कुरळे आहेत.

- तू तुझ्या कुटूंबातील कोणासारखा दिसतोस? काळजीपूर्वक निरीक्षण करुन त्याचे किंवा तिचे नाव व त्यांच्याशी असलेले तुझे नाते लिही.

_____ _____

- तुझ्या कुटूंबातील सदस्यात असलेल्या समानता बघ आणि येथे लिही.

उदाहरणार्थ : माझ्या आणि वडिलांच्या त्वचेचा रंग सारखा आहे.

_____

_____

_____

- एकाच कुटुंबातील सदस्यांची चित्रे इथे दिली आहेत. त्यांच्यात आढळणारे साम्य ओळखून लिही.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED



जाणून घे.

एका कुटुंबातील मुलांच्यामध्ये त्याचे आईवडील, आजीआजोबा आणि इतर कुटुंबातील सदस्य यांच्याशी समानता आढळते. सामान्यतः अशी समानता ही त्वचेचा रंग, केस, डोळे, कान, नाक, चालण्याची आणि हसण्याची पद्धत इत्यादीमध्ये आढळते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ते गावाहून परत येणाऱ्या रामाप्पा आजोबाना भेटले. त्यांनी मुलांना शेताकडे नेले.

दीपा : आजोबा. तुम्हाला मुले किती?

आजोबांनी आपल्या कुटुंबाबद्दल सांगितले.


आजोबा : दिपा, तुझी आजी पुट्टम्मा. आम्हाला दोन मुले. ती म्हणजे तुझे बाबा सुब्बन्ना आणि आत्या लिला. तू आणि राजू तुमच्या वडिलांची दोन मुले. मी, तुझी आजी, बाबा, आई, तू आणि राजू या आपल्या तीन पिढ्या आहेत.

दीपा : आजोबा, मला काही समजले नाही?

राजू : दिपा, मी शाळेत पिढ्याबद्दल शिकलो आहे. ते साधा कुटुंब वृक्ष काढून दाखविता येते. आजोबानी काय सांगितले ते तुला कुटुंब - वृक्ष काढून मी सांगेन. मग तुला सर्व कळेल.

दीपा : राजू ही पट्टी पेन्सिल घे, आणि कुटुंब वृक्ष काढून मला दाखव.

राजू : ठीक आहे. इकडे बघ.



© KTRS NOT TO BE REPUBLISHED

दीपा : हे झाडासारखे दिसते.

राजू : याला कुटुंब-वृक्ष म्हणतात.

हा राजूच्या कुटुंबाचा कुटुंब वृक्ष आहे.

तुझ्या घरी कोण कोण आहेत? इथे लिही.

_____ _____ _____

_____ _____ _____

तुझ्या घरातील वडीलधाऱ्यांच्याकडून आजोबा पणजोबा यांची अधिक माहिती मिळव. पणजोबापासून तुझ्या घरातील सदस्यांचा कुटुंब वृक्ष तयार कर.

कृती : तुझ्या मित्रांनी काढलेल्या कुटुंबवृक्षांचे निरीक्षण कर. त्यातील फरक बघ. वर्गमित्रांशी चर्चा कर.

@KVBS NOT TO BE REPUBLISHED

दीपा : आजोबा तुम्ही मला शेतामध्ये एक मोठे झाड दाखविले, हो की नाही?

आजोबा : हो, मी तरुण असताना मीच ते लावले होते आता ते खूप मोठे झाले आहे.

राजू : आजोबा त्याच्या बाजूला आणखी एक मोठे झाड आहे.

आजोबा : हो, ते झाड तुझ्या वडिलांनी ते तरुण असतांना लावलेले होते.

राजू : आजोबा, उद्या मी आणि दीपा मिळून त्या झाडांच्या बाजूला एक झाड लावणार.

आजोबा : बरं. राजू, ते पण तुझ्यासारखेच वाढेल.

पाठ 17


माझा छंद

X9C1T4

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- मुल्ये आणि छंद यावर कुटुंबाचा आणि मित्रांचा प्रभाव जाणून घेशील.

या चित्रांचे निरीक्षण कर.



येथे काय-काय करत आहेत?

_____ _____

_____ _____

_____ _____

_____ _____

जाणून घे.

- काही लोकांना त्यांच्या रिकाम्या वेळेत त्यांना आवडणाऱ्या काही गोष्टी करण्याची सवय असते या गोष्टींना छंद म्हणतात.

  उदाहरणार्थ : पुस्तके वाचणे, वृतपत्रे वाचणे, पोष्टांची तिकिटे जमा करणे, गाणे म्हणणे, बागेत काम करणे इत्यादी.

NOT TO BE REPUBLISHED © BKTBS

1. तुझ्या रिकाम्या वेळी तू काय करतोस ? तुझे छंद कोणते ?

_____ _____

2. तुझ्या घरातील इतर व्यक्तिंच्या छंदांचे निरीक्षण कर आणि येथे लिही.

_____

_____

3. तुझ्या मित्रांच्या छंदांचे निरीक्षण कर आणि लिही.

_____ _____

_____ _____

4. तू तुझ्या कुटुंबातील व्यक्ती, तुझे मित्र यांच्या छंदामध्ये तुला समानता किंवा फरक दिसून येतो का ? समान असलेले छंद आणि वेगवेगळे छंद खालील कोष्टकात लिही.

समान छंद	वेगवेगळे छंद
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. या छंदांची निवड तू का केलास ?

खालील कारणासह दिलेल्या उत्तराच्या चौकोनात (✓)अशी खूण कर.

मला फार आवडतात	सोईस्कर आणि संधी	आनंद/करमणूक
कुटुंबातील सदस्यांच्या छंदांचा परिणाम	मित्रांच्या छंदांचा परिणाम	शिक्षक/वडील - धाऱ्यांचे मार्गदर्शन

जाणून घे.



सलीम दहा वर्षाचा असतांना त्याला एक पक्ष्याचे पिल्लू खाली पडलेले दिसले. त्याला वाटले की ही चिमणी आहे. त्याने ते पिल्लू हातात घेतले. परंतू जेव्हा त्या पक्ष्याच्या छातीवर पिवळा रंग दिसला तेव्हा त्याला समजले की ती चिमणी नाही. त्या पक्ष्याच्या नावाबद्दल त्याच्या मनात जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यांचे काका अमिरुद्दीन यांनी त्याला 'नॅचरल हिस्टरी सोसायटी' या पक्षी व प्राण्यांचा अभ्यास करणाऱ्या संस्थेत घेऊन गेले. तेथे चाललेल्या क्रियांचा परिणाम या मुलावर झाला. पुढे या मुलाने पक्ष्यांच्या निरीक्षणाचा छंद जोपासला. हाच मुलगा भविष्यात प्रसिद्ध पक्षी निरीक्षक झाला आणि पक्ष्यांच्यावर अनेक पुस्तके लिहिली. तेच हे पद्मश्री सलीम अली.



जगदीश या मुलाला त्याने पाहिलेल्या वनस्पती आणि प्राणी यांच्या जीवन पद्धतीबद्दल माहिती करुन घेण्याची अतिशय आवड होती. त्याने अनेक वनस्पती वाढविल्या, जोपासल्या. जगदीशच्या पालकांनी त्याच्या छंदाला पूर्ण वाव दिला. त्याने रोपे, वेली व झाडे यांच्या जीवनाचा अतिशय अभ्यास केला आणि जगाला पटवून दिले की रोपे व वनस्पती यांना सुद्धा आनंद आणि दुःख यांची भावना असते. तेच हे प्रसिद्ध वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस.

NOT TO BE REPUBLISHED © KBS

अनेक लोकांनी आपला छंद हा व्यवसायच मानला त्यात ते प्रसिद्ध झाले. नाव कमविले. हे त्यांना त्यांच्या घरांच्या लोकांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने व आवडीमुळे शक्य झाले.

कृती : अशा प्रकारची अनेक उदाहरणे तू शिक्षक/वडीलधाऱ्यांच्याकडून संग्रहीत कर. त्याचा तक्ता तयार कर आणि तुझ्या वर्गात लाव.

तुझ्या कुंटुंबातील सर्व सदस्यांना कोण व्हावेसे वाटते आणि का?

_____

_____

येथे तुझे आवडते छंद लिही.


_____

_____

तुझे आवडते छंद जोपासण्यासाठी तुझ्या शिक्षकांचे मार्गदर्शन घे. त्यासाठी चांगला अभ्यास कर.

खाली दिलेली चित्रे बघ. तुला असे करण्यास आवडणाऱ्या चित्राच्या बाजूला (✓) अशी खूण कर. तसे तुला का करावेसे वाटते ते लिही.












@KTPS NOT TO BE REPUBLISHED


















@KTBS NOT TO BE REPUBLISHED

- तू केलेली पाच चांगली कामे लिही. ती चांगली कशी ते सांग?

_____

_____

_____

_____

_____



जाणून घे.

अप्पिको आंदोलन

आपल्या राज्यातील शिर्सी तालुक्यात सालकनी नावाचे एक गाव आहे. गावा सभोवती घनदाट जंगल आहे. एके दिवशी शहरातील कॉंट्रॅक्टर लोक जंगल तोडण्यास आले. जेव्हा ही गोष्ट गावकऱ्यांना समजली तेव्हा, सर्व गावकरी जंगलात पळत आले आणि प्रत्येक जण तोडणाऱ्या झांडानामिठ्ठी मारुन उभे राहिले. जंगल तोड करणाऱ्या लोकांचा नाईलाज झाला. त्यांनी जंगल न तोडताच शहर गाठले. अशा रितीने तेथील लोकांनी झाडांना मिठ्ठी मारुन जंगल वाचविले. याला अप्पिको आंदोलन म्हटले जाते.

जंगल वाचवा, जंगल वाढवा.


जंगलाचा वापर मर्यादित करा.

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

योग्य शब्दाने मोकळ्या जागा भर.

1. सालकनी गावासभोवती _____ आहे.
2. शहरातील लोक झाडे _____ आले.
3. गावातील लोक _____पळत आले.
4. गावातील लोकांनी झांडांना मिठ्ठी मारली आणि _____ वाचवली.
5. जंगल _____, जंगल _____.

तुला चांगला विद्यार्थी/चांगली विद्यार्थिनी व्हायचे आहे? ते कसे? हा खेळ खेळून जाणून घे.



फासा आणि चिंचोके घेऊन हा खेळ खेळा. फासा टाकल्यावर त्यावरील अंकानुसार तुम्ही ठेवलेला चिंचोका तेवढी घरे मोजून पुढे न्या. शिडी असलेल्या घरात चिंचोका आल्यावर तिथे काय लिहिलय ते वाचून वरील घरात जा. पण चिंचोका जर दोरीच्या वरच्या घरात आला तर खाली उतरा. वाचून कारण जाणून घ्या. वाचलेल्यातील चांगले विचार तू शिकलास तर तू चांगला विद्यार्थी/चांगली विद्यार्थीनी होशिल. खेळा आणि चांगले व्हा.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED


पाठ 18


हे देखील आपल्या सारखेच

W4Z5N3

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- विशेष गरज असलेल्या लोकांच्याविषयी सामंजस्यपणा दाखवशील आणि मदतीची गरज ओळखून त्यांना मदत करशील.







वरील तीन चित्रांत तीन स्थिती दाखविल्या आहेत. जर तू या स्थितीत असतास, तर तू काय केला असतास?

_____

_____

_____

आशा आणि लता या मैत्रिणीं आहेत. त्या इयत्ता तिसरीमध्ये शिकतात. लताला अजिबात दिसत नाही. ब्रेल लिपीतील पुस्तके ती वाचते आणि ब्रेल अक्षरांचा उपयोग करुन लिहिते. ती गाणी उत्तम गाते. आशा आणि वर्गातील इतर मुली तिला तिच्या कामात मदत करतात. ती नेहमी आनंदाने शाळेला येते.

- जर तू लताची मैत्रिण/मित्र असशील तर, तू तिला कशी मदत केली असती?

_____ _____

_____ _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे :



ब्रेल: एके दिवशी, एक तीन वर्षाचा मुलगा आपले वडील वापरत असलेले धारदार हत्यार घेऊन खेळत होता. खेळता खेळता त्या हत्याराचे तिक्ष्ण टोक त्याच्या डोळ्यात शिरले आणि त्याने आपली दृष्टी गमावली. त्या मुलाला अभ्यासाची अतिशय आवड होती. त्याने वाचण्यास व लिहिण्यास शक्य होणाऱ्या वेगवेगळ्या गोष्टींचा खूप विचार केला. शेवटी स्पर्श आणि जाणीव याद्वारे तो वाचण्यास व लिहिण्यास शिकला. त्याने या तंत्रांचा विकास करुन दृष्टीची समस्या असणाऱ्यांसाठी त्याने लिपीचा विकास केला. तो मुलगा **लुईस ब्रेल** होय. त्याने तयार केलेल्या अक्षरांना **ब्रेल लिपी** असे म्हणतात.

एका जाड कागदावर उंचवट्याच्या गोल खुणा ओळीत तयार केलेल्या असतात. त्या गोल खुणांना स्पर्श करुन अक्षरे ओळखता येतात. डोळ्यांची मदत न घेता कोणी पण गोल खुणांच्या संख्येवरुन आणि उंच गोल खुणांच्या नमुन्यावरुन अक्षरे ओळखू शकतो.

अ आणि **आ** ब्रेल लिपीत पहा.

	• •		• •
अ	• •	**आ**	• •
	• •		• •


'**अ**' आणि '**आ**' हे 6 गोल खुणांनी दाखविलेले असतात. 'अ' मध्ये एक खुण इतर खुणापेक्षा जाड असते. 'आ' मध्ये तीन खुणा इतर खुणापेक्षा जाड असतात. त्यामुळे ती अक्षरे ओळखता येतात.


© BTTLS NOT TO BE REPUBLISHED


गिता ही एक हुषार मुलगी आहे. ती आपल्या मैत्रिणी सोबत शाळेत खेळते. तिला ऐकू येत नाही आणि बोलता पण येत नाही. गिताच्या सांगण्याच्या सर्व खुणा तिच्या सर्व मैत्रिणींना समजतात.


तुला काय हवे आहे हे खुणांचा उपयोग करुन व्यक्त करणाचा प्रयत्न करण्यास तुझ्या मित्रांना सांग.


या खुणा काय व्यक्त करत आहेत ते ओळख आणि लिही.


















@KTBS NOT TO BE REPUBLISHED





कृती :

- काही स्थितींमध्ये आम्ही संदेश खुणाद्वारे व्यक्त करतो. अशा स्थिती आणि चिन्हे लिही. उदाहरणार्थ: जर तुझे मित्र वर्गात बोलत असतील आणि शिक्षिका शिकवत असेल तेव्हा, शिक्षिकेने शांतता पाळण्यास खुणेने व्यक्त केले-तोंडावर बोट ठेवणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

- खालील विधाने वाच आणि कृती कर.

मला पाणी हवे आहे.	मला जेवण हवे आहे	मला झोपावेसे वाटते.
घंटा वाजली.	बाबा येतील.	हात दुखत आहे.
चेंडू घेऊन खेळ.	दोरीच्या उड्या मार.	मी नृत्य करणार आहे.

रविच्या पायाची काही तरी समस्या आहे. तो चालू शकत नाही. त्याने नुकताच शाळेत प्रवेश घेतला आहे. जर रवि शाळेत असेल तर, तू त्याला कशी मदत करशील?

_____

_____

_____

_____


तुझ्या परिसरातील लोकांचे निरीक्षण कर. काही लोक शारीरिक अपंग असलेले आढळतील अशा लोकांना त्यांच्या कामात काही सोयी आणि मदतीची गरज असते. मित्रांचे सहकार्य त्याला आवश्यक असते.

विशेष गरजा मिळाल्यानंतर शारीरिक अपंग असणाऱ्या किती तरी लोकांनी जिद्द आणि आवडीच्या जोरावर अनेक गोष्टीत यश मिळविले आहे. वडीलधाऱ्यांच्याकडून अशा लोकांची माहिती मिळव. त्यापैकी एका बद्दल 4 ओळी माहिती लिही.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.

डॉ. पुट्टराज गवई



डॉ. पुट्टराज गवई हे कला, साहित्य, संगीत आणि नाटक यासाठी प्रसिद्ध आहेत.

बालपणीच त्यांनी आपले दोन्ही डोळे गमावले होते. ते पंचाक्षरी गवईचे शिष्य होते. ते सुप्रसिद्ध गायक होते. ते सर्व प्रकारची संगीत वाद्ये वाजवत. त्यांनी ब्रेल लिपी शिकून घेतली आणि 64 पेक्षा जास्त शास्त्रिय संगीतावर पुस्तके लिहिली. 15 हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संगीताचे धडे घेतले. इ.स. 2010 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. समाजासाठी त्यांनी केलेले योगदान अमूल्य आहे.

पाठ 19

सण आणि जत्रा

J1U7R1

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,


- स्थानिक सण, समारंभ, अणि जत्रेमध्ये सहभागी होणाऱ्या लोकांच्यातील सहकार्य करण्याचा उत्साह ओळखशील.



मी रमेश. आम्हाला दिपावलीचा सण महत्वाचा. आम्ही हा सण सतत तीन दिवस साजरा करतो. पहिला दिवस नरक चर्तुदशी, दुसरा दिवस गोपुजा (गाईची पुजा) आणि लक्ष्मीपूजन (संपती देवतेची पुजा). तिसरा दिवस बलीप्रतिपदा.

या तीन दिवसात आम्ही दिवे पेटवितो. गोडधोड खातो, शेजारी यांना देतो आणि फटाकड्यांची आतषबाजी करुन आनंद लुटतो. आम्ही या सणामध्ये फार फार मजा करतो.





मी नगिना. रमजान हा आमचा एक महत्वाचा सण आहे. रमजानच्या महिन्यात आम्ही दिवसा उपवास करतो आणि शेवटच्या दिवशी मोठ्या उत्साहाने सण साजरा करतो. या दिवशी आम्ही विशेष असे अनेक गोड पदार्थ तयार करतो आणि शेजारी यांना देतो. मित्र आणि शेजारी एकमेकास शुभेच्छा देतात.



© KSB NOT TO BE REPUBLISHED



मी रॉबिन, नाताळ हा आमचा महत्वाचा सण आहे. या सणाच्यावेळी आम्ही ख्रिसमस झाडाची सजावट करतो आणि त्याला भेट वस्तू टांगतो. मित्र आणि नातेवाईक या दिवशी आमच्या घरी भेट देतात. आम्ही एकमेकाला शुभेच्छा देतो आणि सणाची मजा लुटतो.



रमेश, नगिना, आणि रॉबिन यांनी आपल्या घरी साजऱ्या करण्यात येणाऱ्या सणांचे वर्णन केले आहे.

तू तुझ्या घरी कोणकोणते सण साजरे करतोस?

_____ _____ _____

_____ _____ _____

सणांच्यावेळी तू घराची सजावट कशी करतोस? त्या दिवशी तुझ्या वडीलधाऱ्यांना तू कशी मदत करतोस?

_____

_____

तुझ्या घरी साजऱ्या केल्या जाणाऱ्या महत्वाच्या सणांविषयी चार ओळी लिही.

_____

_____

@RTBS NOT TO BE REPUBLISHED

सणा दिवशी होणाऱ्या विशेष करमणूकीच्या कार्यक्रमांची यादी तयार कर. हे कार्यक्रम कोण सादर करतात ? खाली दिलेल्या तक्त्यात लिही.

कार्यक्रम	कोण	कोठे

सणादिवशी तुझ्या घरी कोण-कोण भेट देतात ?

_____

सणा दिवशी तुझ्या घरी कोणकोणते खाद्यपदार्थ तयार केले जातात ?

_____

_____

तुझा आवडता पदार्थ कोणता ? तुझ्या मित्रांना सांग.

_____



जाणून घे.

- सण कुटुंब सदस्यांना, नातेवाईकांना, मित्रांना आणि शेजाऱ्यांना एकत्र आणतात.

तू तुमच्या घरी साजरे होणारे सण याबद्दल सांगितलास. तुझ्या परिसरातील सर्व लोक एका ठिकाणी एकत्र येऊन जे सण साजरे करतात त्यांची नावे खाली लिही.

_____, _____, _____, _____,

_____, _____, _____, _____ .

@KVRS NOT TO BE REPUBLISHED

हा खेळ खेळा.

चित्रातील खेळ पहा आणि जत्रा पहा. खालील तक्त्यात 25 चौकोन आहेत. फाश्याचा उपयोग करुन त्यावर आलेल्या संख्येनुसार त्यावर प्यादे चालव. कोणत्या चौकोनावर प्यादे ठेवले आहे ते बघ आणि त्या चौकोनात काय आहे म्हणजे कशाचे चित्र आहे ते वहीत लिही. शेवटी फासा पडलेल्या चौकोनातील चित्रांची माहिती एकत्र कर. तुझ्या मित्रांच्या सोबत सुद्धा हा खेळ खेळ.



✻तुझ्या परिसरात कोणती जत्रा साजरी केली जाते ?

✻तू पाहिलेल्या जत्रेबद्दल माहिती सांग.

येथे खाली एका जत्रेचे दृश्य दिले आहे. इथे चाललेल्या क्रिया ओळख आणि दिलेल्या जागेत लिही. या क्रिया कोण कोण करत आहेत.



जाणून घे.

एखाद्या ठिकाणचे किंवा परिसरातील सर्व लोक एकत्र येऊन काही सण साजरे करतात. जत्रा सुद्धा सामाजिक सणच आहेत. जत्रांना उत्सव असे सुद्धा म्हणतात. जत्रेमध्ये सर्व लोक एकत्र येऊन काम करतात आणि आनंद लुटतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

गा आणि आनंद लुटा

गेले होतो मी जत्रेला,
आमच्या गावच्या जत्रेला.
सारे जमलो आनंदात,
जत्रेत मजा केली खूप जोरात.
झगमग-झगमग दिव्यांची,
गोड मिठाई खाण्याची.
गोड गोड मिठाई खाऊन,
घरी आलो नाटक पाहून.

गा आणि आनंद लुटा

गेले होते मी जत्रेला हो जत्रेला.

जत्रेला जाऊन काय आणलस ? काय आणलस?

कात्री आणली बाई मी कात्री आणली

गेले होते मी जत्रेला हो जत्रेला.

जत्रेला जाऊन काय आणलस ? काय आणलस?

शिट्टी आणली हो मी शिट्टी आणली.

गेले होते मी जत्रेला हो जत्रेला.

जत्रेला जाऊन काय आणलस ? काय आणलस?

सायकल आणली हो मी सायकल आणली.

गेले होते मी जत्रेला हो जत्रेला.

जत्रेला जाऊन काय आणलस ? काय आणलस?

मोती हार आणला हो मी मोतीहार आणला.

गेले होते मी जत्रेला हो जत्रेला.

जत्रेला जाऊन काय आणलस ? काय आणलस?

बांगडया आणल्या हो मी बांगडया आणल्या.

(हे गाणे गाताना एका बाजूला काही मुली व दुसऱ्या बाजूला काही मुली उभे करुन हावभाव करत म्हणावे. जत्रेशी संबंधीत गाण्यांचा संग्रहकर.)

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

पाठ 20


माझा एक दिवस


Z2K2J6

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- आपल्या दररोजच्या कृतींचा तक्ता बनवशील.
- काही मुलांच्या बाबतीत कामे करण्याचे टाळता न येणाऱ्या परिस्थिती संबंधीची माहिती समजावून घेशील.


रामू हा इयत्ता 3 रीचा विद्यार्थी आहे. रामूच्या दररोजच्या क्रिया दाखविणारी चित्रे बघ. त्या क्रियांची नावे खाली लिही.







©KTBS NOT TO BE REPUBLISHED




















©KTBS NOT TO BE REPUBLISHED





रामूच्या एका दिवसातीत क्रिया तुला माहीत झाल्या आहेत.

आता सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत तुझ्या क्रियांची क्रमवार यादी तयार करुन एक तक्ता बनव.

1 _____

2 _____

3 _____

4 _____

5 _____

6 _____

7 _____

8 _____

9 _____

10 _____

तू बनविलेल्या तक्त्याची तुलना तुझ्या मित्रांच्या तक्त्यांशी कर. काय फरक आहेत? निरीक्षण कर.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खाली क्रियांची एक यादी आहे. या क्रिया क्रमवार लिही.

1. मी रात्रीचे जेवण करुन झोपतो. 1) _____
2. मी शाळेला जातो. 2) _____
3. मी झाडांना पाणी घालतो. 3) _____
4. मी अंघोळ करून न्याहरी करतो. 4) _____
5. मी सकाळी लवकर उठतो. 5) _____
6. मी शाळेत शिकविलेल्या पाठांचा अभ्यास करतो. 6) _____
7. मी संध्याकाळी माझ्या मित्रांच्या बरोबर खेळतो. 7) _____

कृती : सुमाची सचित्र कथा येथे दिलेली आहे. ती वाचा आणि खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

@RTBS NOT TO BE REPUBLISHED







@KITABGHAR
DO NOT TORE REPUBLISHED

सुमाला सोबत घेऊन शाळेला जाण्यासाठी तिच्या घरी कोण आले?

_____

शाळेला जायचे सोडून सुमा कामाला का गेली?

_____




_____

सुमा परत शाळेला केव्हा जाऊ लागली?

_____

_____

या चित्रांचे निरीक्षण कर.

© NOT TO BE REPUBLISHED

मुले कोणकोणती कामे करत आहेत ?

_____

_____

_____

अशी कामे करत असतांना मुलांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते? कोणत्या प्रकारच्या समस्या निर्माण होतात? तुझ्या वडीलधाऱ्यांना विचारुन लिही.

_____

_____

_____

अशी मुले काम का करतात? कारणे समजावून घे आणि लिही.

_____

_____

_____

_____



जाणून घे.

लहानपणी काहीं मुले कामात गुंतलेली असतात. त्यांना काही समस्यांना तोंड द्यावे लागते.

- त्यांचे शाळा, शिक्षण आणि खेळ यांचे मार्ग बंद होतात. ते योग्य शिक्षणाची संधी घालवितात.
- काही कामे मुलांच्यासाठी धोकादायक असतात. अशा मुलांच्या आरोग्याची जबाबदारी कोणी घेत नाही.
- त्यांना मालकांच्याकडून शिक्षा होऊ शकते.
- त्यांना वाईट सवयी लागण्याची शक्यता असते.

म्हणून सरकारने बालकामगार प्रतिबंध कायदा जारी केला आहे. शाळेला जाण्याच्या वयाच्या मुलांना शोधून त्यांना शाळेमध्ये आणले जात आहे. अशा मुलांना चांगले शिक्षण पुरविण्यासाठी मेहनत घेतली जात आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षण घेणे हा प्रत्येक मुलामुलींचा मुलभूत हक्क आहे.
प्रत्येक मुलामुलींने शिक्षण घेतलेच पाहिजे.

पाठ 21

लपंडाव - एक खेळ

A2T9X8

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- आंतरांगण आणि बाह्यांगण खेळांचे वर्गीकरण करशील.
- स्थानिक आणि व्यवसायिक खेळांबद्दल जास्त माहिती मिळवशील.
- खेळाचे फायदे समजावून घेशील.
- गोष्टीची पुस्तके, खेळ, रेडिओ. टी.व्ही. यापासून होणारी करमणूक ओळखशील.



NOT TO BE REPUBLISHED © SCERT

डोळे मी मिटविले दिसत नाही त्याला,
उडिदाचे पोते पडून गेले, जुना खांब निखळून गेला,
दिसत नाही त्याला आता दिसत नाही त्याला,
आमचा पक्षी मी सोडते तुमचा पक्षी आता लपवा.

राणीने मोठ्याने हे गाणे म्हटले आणि श्रेयसचे आपल्या हाताने झाकलेले डोळे उघडले. जेव्हा ती गाणे म्हणत होती तेव्हा सुमा, विनय, जॉन आणि हसिना झाडांमागे लपले.

जेव्हा श्रेयस त्यांना शोधत होता तेव्हा, सुमा, जॉन व हसिना चटकन बाहेर आले आणि राणीला स्पर्श करुन ओरडले ''ओ! आम्ही राणीला स्पर्श केला''. परंतु विनयने राणीला स्पर्श करण्याअगोदर श्रेयसने विनयला स्पर्श केले आणि ओरडला ''आऊट''. तेवढ्यात पाऊस सुरु झाला. सर्वजण श्रेयसच्या घरात गेले.

श्रेयस : माझ्या काकांनी गोष्टींची खूप पुस्तके आणली आहेत. तुम्हाला ती पहायला आवडतात का?

विनय : नाही, आभारी आहे. आज रविवार आहे. आता टी.व्ही.वर मुलांचे कार्यक्रम पाहूया.

राणी : नको, आपण रेडिओवर गाणी ऐकूया.

सर्वजण : नको नको, आपण खेळ खेळूया.
बर तर, आपण कोणता खेळ खेळूया?
(पुन्हा चर्चा सुरु झाली)

राणी : आपण चौकबारा (चौकोनाचा खेळ) खेळूया.

श्रेयस : परंतु आपण सहाजण आहोत. चौकबारा खेळ खेळायला चार जण लागतात.

सुमा : मग, आपण गाई गोठा खेळ खेळूया.

जौन : नको. तो खेळ दोघेजणच खेळतात.

हसिना : कॅरमबद्दल कसे काय?

श्रेयस : क्षमा करा! माझ्याकडे कॅरम बोर्ड नाही.

विनय : मग, आपण गजगांचा खेळ खेळूया?

एवढ्यात जॉनने बाहेर पाहिले आणि म्हणाला पाऊस थांबला, चला बाहेर जाऊन खेळ खेळूया. मुले आनंदाने ओरडतच बाहेर आली. पण कोणता खेळ खेळायचा हा प्रश्न पुन्हा निघाला. प्रत्येक जण आपणास माहीत असलेल्या खेळाचे नाव घेऊ लागला. त्यांनी कोणता तरी एक खेळ खेळण्याचे ठरविले. त्यासाठी लगोरी, सुरपारंब्याचा खेळ, विटी दांडू, खडयांचा खेळ, भोवरा फिरविणे, क्रिकेट, बेडूक उडया, दोरीवरील उड्या, चेंडू खेळ यावर चर्चा झाली. शेवटी त्यांनी सुरपारंब्याचा खेळ खेळण्याचे ठरविले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


पाठात सांगितलेल्या सर्व खेळांची नावे येथे लिही.


_____ _____ _____

_____ _____ _____

_____ _____ _____

यापैकी घरात खेळता येणाऱ्या खेळांची नावे वर्तुळात आणि घराबाहेर खेळल्या जाणाऱ्या खेळांची नावे चौकोनात लिही. तुला माहीत असलेल्या किंवा तू खेळलेल्या खेळांना खूण कर. तुला माहीत नसलेल्या खेळांच्याबद्दल शिक.





@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.


- घराबाहेर किंवा मैदानात खेळल्या जाणाऱ्या खेळांना मैदानी खेळ (बाह्यांगण खेळ) म्हणतात.
- घरात खेळता येणाऱ्या खेळांना घरगुती खेळ (आंतरांगण खेळ) म्हणतात.

तू खेळत असलेल्या मैदानी खेळांची आणि घरगुती खेळांची नावे लिही.

मैदानी खेळ	घरगुती खेळ
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____

तुझ्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तू खेळलेल्या खेळांची यादी कर.












NOT TO BE REPUBLISHED © BKTBS




















© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती :

- मागील पानावरील चित्रातील खेळांची नावे लिही. हे खेळ खेळण्यास लागणारे साहित्य कोणकोणते ते लिही. जर तुला माहीत नसेल तर वडीलधाऱ्यांना विचार आणि लिही.


खेळाचे नाव	**लागणारे साहित्य**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


- दोरी, दगड व चिंचोके यांचा उपयोग करुन खेळता येणारे खेळ खाली लिही.

या खेळांच्या बद्दल माहिती करुन घे.


तुझ्याकडे एक चेंडू आहे. या चेंडूचा उपयोग करुन कोणते खेळ तू खेळू शकतोस? चेंडू सभोवती असणाऱ्या चौकानांत लिही.











- वरीत चित्रांपैकी कोणते चित्र तुला फार आवडले? का?

_____

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



जाणून घे.

- टी.व्ही., रेडिओ आणि पुस्तके यापासून आपली करमणूक होते आणि माहिती सुध्दा मिळते.
- खेळ खेळल्याने आपली करमणूक होते. शरीराला आणि मनाला ताजेपणा मिळतो.
- विविध खेळ खेळल्याने आपले शरीर सशक्त आणि निरोगी बनते.

तू खेळत असलेल्या खेळांची यादी कर.

तुला आवडणारे घरगुती खेळ आणि मैदानी खेळ यांची नावे लिही.

तुझ्या आवडत्या खेळाबद्दल चार ओळी लिही.

घरगुती खेळ :

_____

_____

_____

_____

मैदानी खेळ :

_____

_____

_____

_____

तुझ्या मित्रांच्या बरोबर तुझा आवडता खेळ खेळ.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हा खेळ खेळा.

हा खेळ तुझ्या मित्रांच्या बरोबर खेळ. तू आणि तुझे मित्र तुमचे हात शर्टामध्ये (कपड्यात) लपवा. तुमच्या पैकी एकट्याने एक प्रश्न विचारायचा आणि बाकीचे सर्वजण उत्तर देतील.

प्रश्न	**उत्तर**
हात कोठे गेले होते?	गेले होते ते बाजाराला.
बाजारातून काय आणल?	बाजारातून आणला ऊस
ऊस आणून तू काय केलास?	त्याचा रस मी चाखिला.
ऊसाचा चोथा काय केलास?	तो टाकला कचऱ्यांच्या खड्डयात.
खड्डयाने तुला काय दिले?	खड्डयाने मला दिले खत.
खताचे तू काय केलास?	खत मी घातल शेतात.
शेताने तुला काय दिले?	शेताने मला दिला चारा.
चारा घेऊन तू काय केलास?	चारा मी घातला गाईला.
गाईने तुला काय दिले?	गाईने मला दिले दूध.
दुधाचे तू काय केलास?	दूध मी प्यालो, शक्तीवान झालो.

(तुमच्या परिसरात अनुकुल होईल असे बदल करुन हे गीत तुम्ही गाऊ शकता.)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 22

एका मडक्याची गोष्ट

F7W6J2

या पापाठाच्या अध्ययना नंतर तू,

- मानवाने आपल्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी विविध वस्तूंची निर्मिती केली. **उदाहरणार्थ :** मडके आणि चाक यांचे स्पष्टीकरण करशील.
- मडकी वापरण्यात क्रमाने झालेले बदल यांची चर्चा करशील.
- चिखल वापरुन मडक्यांची प्रतिकृती तयार करशील.

तुला माहीतच आहे की आम्हाला दैनंदिन जीवनात अनेक वस्तूंची आवश्यकता असते. खाली दिलेल्या चौकोनात पाच वस्तूंची नावे लिही.

तुला दररोज अन्नाची गरज आहे. तुझ्या घरी अन्नपदार्थ कसे तयार करतात याचे निरीक्षण कर.

अन्न पदार्थ तयार करण्यास कोणकोणते साहित्य लागते ? येथे लिही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


अन्न पदार्थ बनविण्यासाठी आणि पाणी साठविण्यासाठी विविध प्रकारची भांडी वापरतात याबद्दल तुला माहिती आहे. सामान्यपणे भांडी तयार करण्यास कोणते साहित्य वापरतात हे तुला माहीत आहे का? 5 साहित्यांची नावे लिही.

पूर्वी स्वंयपाकाची भांडी बनविण्यास कोणते साहित्य वापरत असत हे तुला माहीत आहे का?










© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मडकी बनविण्यास कोणते साहित्य वापरतात? येथे लिही.

मडकी कोणत्या कामासाठी वापरतात? तुला माहीत आहे का? येथे लिही.

मडकी तयार करण्याच्या ठिकाणी जा. मडकी तयार करण्याची पद्धत बघ आणि दोन ओळी लिही.










चाक फिरवितो गरा गरा
मडकी बनवितो भरा भरा
तर मी कोण?



तुझ्या घरी मडकी वापरतात का? ती कशासाठी वापरतात? येथे लिही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खाली दिलेली चित्रे बघ. त्यामध्ये तुला कोणते फरक दिसतात? फरक सांग.

पूर्वी	आता
	
	
	
	
	

@KTBS TO BE REPUBLISHED

कृती:

- तुझ्या घरी किंवा परिसरात लोक स्वयंपाक करण्यास कोणकोणत्या उपकरणांचा वापर करतात ते वडीलधाऱ्यांना विचारुन घे.

  आता ती उपकरणे तुझ्या घरी वापरतात का हे बघ. या उपकरणांची यादी कर.

पूर्वी (अगोदर)	आता

अगोदरची उपकरणे आणि आताची उपकरणे यात तुला फरक दिसतो, हा फरक का झालेला आहे? तुझे मित्र, शिक्षक आणि वडीलधाऱ्यांशी चर्चा कर.

जर तुझ्या परिसरात कुंभार असतील तर तेथे तू जा आणि मडकी तयार करण्याची पद्धत बघ. मडक्यांचा रंग, आकार यांचे निरीक्षण कर. ही मडकी कशासाठी वापरतात याबद्दत कुंभाराशी चर्चा कर.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे तू स्वतः कर :

- चिखलाचे एक लहान मडके तयार कर. त्यात पाणी किंवा धान्य भरुन पक्ष्यांना ठेव.
- मासा, फळे, खेळणी, लहान भांडी, पैसे साठविण्याचे मडके इत्यादी वस्तू चिखलापासून बनव आणि त्यांना रंगव.

पाठ 23


पृथ्वी - आपले घर


V8M1C7


या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- पृथ्वीचा आकार समजून घेतील.
- ढगाळ, पाऊस, थंड आणि गरम हे शब्द वापरुन एका दिवसातील हवामानातील बदल स्पष्ट करतील.
- सुर्योदयची मदत घेऊन दिशांची ओळख लक्षात ठेवतील.

आकाशातील मित्रांच्या विषयी तू शिकला आहेस. या मित्रांची नावे खाली दिलेल्या चौकोनात लिही. चित्रांची मदत घे.








@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे तू स्वतः कर :

- एक ताट घे. त्याच्यात रंगीत पाणी घाल. हे ताट सूर्यप्रकाशात असे ठेव की त्यात सूर्याची प्रतिमा दिसावी. पाण्यातील सूर्य प्रतिमेचे निरीक्षण कर.
- पौर्णिमेचा चंद्र तू पाहिला असशीलच. त्याच्या आकाराचे दोन ओळीत वर्णन कर.

खाली दिलेले चित्र बघ. हे कोणते चित्र आहे? त्याचे नाव बाजूच्या चौकोनात लिही.







चित्रातील पृथ्वीच्या आकाराचे निरीक्षण कर. पृथ्वीचा आकार आणि चंद्राचा आकार यांची तुलना कर. कोणता फरक दिसतो? लिही. सूर्य, चंद्र व पृथ्वी यांचे आकार खालील तक्त्यात लिही.

1	सूर्य	
2	चंद्र	
3	पृथ्वी	

NOT TO BE PUBLISHED


खाली दिलेल्या फळांच्या चित्रांपैकी कोणते फळ पृथ्वीच्या आकाराशी समानता दर्शविते ?

संत्र्याचा आकार हा पृथ्वीच्या आकाराशी समानता दाखवितो याचे निरीक्षण कर.


कृती : एक संत्रे घे. त्याच्या उत्तर आणि दक्षिण भागांना स्पर्श कर. तुला कसे वाटते ?



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.

- आपण रहात असलेल्या पृथ्वीला सुद्धा दोन टोके आहेत. एक उत्तर टोक व दुसरे दक्षिण टोक.
- संत्र्याप्रमाणेच पृथ्वीची पण उत्तर व दक्षिण टोके सपाट आहेत. पृथ्वीला स्वतःचा विशिष्ट आकार आहे. या विशेष आकाराला भूम्याकार असे म्हणतात.
- पृथ्वीचे निळ्या, हिरव्या आणि तपकिरी रंगातील फोटो बघण्यास फार आकर्षक वाटतात.



या चित्राचे निरीक्षण कर. ही पृथ्वीची लहान प्रतिकृती आहे. याला पृथ्वीचा गोल म्हणतात. याचा उपयोग करुन पृथ्वीबद्दलची माहिती आम्ही करुन घेऊ शकतो. पृथ्वीचा गोल पृथ्वीचा आकार, लांबी आणि रुंदी अगदी बरोबर दाखवितो.


विचार कर आणि पृथ्वीच्या गोलाचे उपयोग खाली लिही.

1. _____

2. _____

तुझ्या शाळेतील पृथ्वीच्या गोलाचे निरीक्षण कर. त्यावर जमिनीचा भाग आणि पाणी असलेला भाग दाखविण्यासाठी कोणते रंग वापरलेले आहेत?


खाली दिलेल्या चित्रात जमिनीचा भाग आणि पाण्याचा भाग ओळख आणि योग्य रंग वापरुन रंगव.



©KTRS NOT TO BE REPUBLISHED

गा आणि आनंद लुटा

गोल पहा गोल, गोल पहा गोल,
तो आहे पृथ्वीच्या, नमुन्याचा गोल,
स्वतः भोवती कशी, फिरते ते पहा,
दिवस रात्रीचा खेळ, होतो कसा पहा.
विशाल भूमी अन्, पाण्याचा पसारा पहा.
सर्व सजीवांचा, आधार हा पहा.




तुला माहीत आहे की पृथ्वीचा गोल ही पृथ्वीची प्रतिकृती आहे. याच्या मदतीने पृथ्वीविषयी अधिक माहिती शिकणे सोपे जाते.

पृथ्वीचा गोल घे. त्याच्या सपाट टोकांचे निरीक्षण कर. वरील टोकाला 'उत्तर ध्रुव'
व खालील टोकाला 'दक्षिण ध्रुव' म्हणतात.


पृथ्वीच्या गोलावर काढलेल्या आडव्या आणि उभ्या रेषांचे निरीक्षण कर. या पृथ्वीच्या गोलाकार काढलेल्या काल्पनिक रेषा आहेत. वास्तव्यात त्या पृथ्वीवर दिसत नाहीत. एखाद्या ठिकाणाची वेळ आणि दोन ठिकाणांतील अंतर समजण्यास या रेषा काढण्यात आल्या आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED




येथे दिलेल्या चित्राचे निरीक्षण कर. या चित्रात पृथ्वीच्या गोलावर आडव्या समांतर रेषा काढलेल्या आहेत. ही 'अक्षांश' आहेत. मुख्य अक्षांशांना ठराविक नावे दिलेली आहेत. चित्रातील नावे वाच.

या चित्रात काढलेल्या रेषांचे निरीक्षण कर. या उभ्या रेषा पृथ्वीच्या गोलवर काढलेल्या आहेत. या रेषांना 'रेखांश' म्हणतात. चित्रातील महत्वाच्या रेखांशचे नाव वाच.



@KTBS TO BE REPUBLISHED



पृथ्वीच्या गोलवरील जमिनीच्या भागाला मृदावरण आणि पाण्याच्या भागाला जलावरण असे म्हणतात. वरील चित्रात जमिनीचा भाग इकडे तिकडे कसा पसरलेला आहे ते बघ.


पृथ्वीच्या गोलावर जमिनीचे जे विभाग दिसतात त्यांना खंड असे म्हणतात. या खंडांच्या सभोवती पाण्याने व्यापलेला अफाट भाग हे महासागर आहेत.

चित्ररूप गोष्ट वाच

ते सुंदर असे जंगल होते. एक हरीण आपल्या पाडसासह तेथे रहात होते. हरीण सकाळी लवकर उठले.



हरीणने त्यांना उठविले व ते अन्नाचा शोधात निघाले.





अन्न शोधू झाल्यानंतर





WWW.TOUCH@KTBS.COM NOT FOR REPRODUCTION





मुलांनो, चिट्टी आणि चिन्नीची गोष्ट कशी वाटली?

कृती : एका आठवड्यात वेगवेगळ्या दिवशी व वेगवेगळ्या वेळी होणारे हवामानातील बदलांचे निरीक्षण कर. तुझ्या निरीक्षणावरुन दिसून आलेल्या बदलानुसार (✓) अशी खूण कर.

अ नं	दिवस	वेळ	थंड	गरम	ढगाळ	पाऊस	इंद्रधनुष्य
1	सोमवार	सकाळ दुपार संध्याकाळ					
2.	मंगळवार	सकाळ दुपार संध्याकाळ					
3.	बुधवार	सकाळ दुपार संध्याकाळ					
4.	गुरुवार	सकाळ दुपार संध्याकाळ					
5.	शुक्रवार	सकाळ दुपार संध्याकाळ					
6.	शनिवार	सकाळ दुपार संध्याकाळ					
7.	रविवार	सकाळ दुपार संध्याकाळ					

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



जाणून घे.

गरम, थंड, ढगाळ, उबदार आणि पाऊस हे हवामानाचे घटक आहेत. प्रत्येक दिवशी ह्या घटकांत बदल होत असतात. दिवसा-दिवसाला तसेच तासा-तासाला होणारा वातावरणातील बदल याला आपण हवामान म्हणतो. सकाळ आणि संध्याकाळच्यामानाने दुपारी सूर्यप्रकाशाची तिव्रता जास्त असते. पावसाळ्यात संध्याकाळी ढगाळ हवामान असते. यावेळी वीज पडणे व गडगडाट होणे अशा घटना सुद्धा काही वेळा होतात.

कृती :

- उन्हाळ्यातील दिवसांचे उपयोग लिही.

1. धुवून वाळत घातलेते कपडे लवकर सुकतात.
2. _____
3. _____
4. _____
5. _____

- पावसाळ्याचे उपयोग लिही.


1. वनस्पतीची वाढ चांगली होते.
2. _____
3. _____
4. _____
5. _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती : दिलेले चित्र बघ व त्यानुसार इंद्रधनुष्याला रंग दे. आकाशात दिसणाऱ्या इंद्रधनुष्यातील रंगांचे निरीक्षण कर.




मागीत इयत्तेत दिशांचा अभ्यास तू केला आहेस. त्याची आठवण कर. खालील चित्र बघ. सबिना सूर्यास्त बघत आहे. यावरुन चित्रातील चौकानामध्ये दिशांची नावे लिही.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सूर्योदय होण्याच्या दिशेवरुन पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या चार दिशा ठरविण्यास तू शिकला आहेस. खालील चित्राचे निरीक्षण कर. वर्गखोलीत काही विद्यार्थी एक खेळ खेळत आहेत. ते कोणकोणत्या दिशांना उभे आहेत हे दिलेल्या



चौकानांत लिही.

श्रीनाथ, किर्ती, रिता व श्रृती उभे असलेल्या दिशा तू चटकन ओळखतोस हो की नाही? आता खालील चित्र पाहून सुरेश, सुचित्रा, रफिक व प्रतिक उभे



@KBPS NOT TO BE REPUBLISHED

असलेल्या दिशा ओळखून लिही.

पूर्व आणि दक्षिण यांच्या मध्ये असणारी दिशा आग्नेय आहे. खालील वाक्ये पूर्ण कर.

- नैऋत्य दिशा _____ आणि _____ यांच्या मध्ये आहे.
- पश्चिम व उत्तर दिशांच्या मध्ये _____ दिशा आहे.
- ईशान्य दिशा _____ व _____ यांच्या मध्ये आहे.

हे तू स्वतः कर :

दिशांची नावे लक्षात ठेवण्याचे एक तंत्र खाली दिलेले आहे. त्याचा वापर कर आणि दिशा लक्षात ठेव.

तंत्र - 1

आ नै वा ई

(आग्नेय, नैऋत्य, वायव्य, ईशान्य)

तंत्र - 2

उ ई पू आ द नै प वा

(आठ दिशांची पहिली अक्षरे)

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

दिशा लक्षात ठेवण्यास किंवा दाखविण्यास काही साध्या तंत्राचा वापर केला जातो. तुझ्या शिक्षकांच्याकडून किंवा वडीलधाऱ्यांच्याकडून आणखी काही जास्तीची तंत्रे माहीत करुन घे.

पाठ 24


नकाशा


Y7S8I6

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- परिसराचा साधा नकाशा ओळखशील.

रमेशने आपल्या वर्गखोलीचा आराखडा काढला आहे. त्या आराखड्याचे निरीक्षण कर.





अनुक्रमणिका

चिन्ह	तपशील
	फळा
	शिक्षकांची खूर्ची
	टेबल
	रमेश
	रियाज
	शीला
	केवीन
	सीता
	दरवाजा
	खिडकी
	कचरापेटी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

रमेशने वर्गखोलीच्या उजव्या बाजूच्या दुसऱ्या बाकावर आपण बसण्याची खूण केली आहे. आता चित्र बघ आणि खालील मोकळ्या जागी योग्य उत्तर लिही.

- रमेशच्या वर्गखोलीचा दरवाजा_____ दिशेला आहे.
- रमेशच्या उजव्याबाजूच्या पहिल्या रांगेमध्ये बसलेल्या मुलीचे नाव _____ आहे.
- फळा आणि टेबल यांच्या मध्ये _____ आहे.
- वर्ग खोलीच्या आग्नेय दिशेला_____ वस्तू ठेवलेली आहे.
- रियाजच्या उजव्या बाजूला बसलेली सीता_____ क्रमांकाच्या बाकावर आहे.

रमेश प्रमाणे तू सुध्दा तुझ्या वर्गखोलीचा साधा आराखडा तयार कर. त्यामध्ये वर्ग खोलीतील वस्तूंचे स्थान खुणेने दाखव. वस्तूंच्या चिन्हांचा वापर कर.


@KYBS NOT TO BE REPUBLISHED


जाणून घे.

- एखाद्या ठिकाणचा लहानसा आराखडा हा जागेचा आकार, सिमा, नदी, टेकडया, रस्ते आणि इमारती, त्यांचे स्थान आणि त्यांच्यातील अंतर हे सर्व चित्ररुपाने देत असेल तर त्याला 'नकाशा' असे म्हणतात. नकाशामुळे मोठी विस्तारित जागा लहान कागदावर दाखविता येते.
- तू पृथ्वीचा गोल पाहिला असशीलच होय की नाही? तो सुद्धा सपाट कागदावर काढता येतो. तो सुद्धा एक नकाशाच आहे. पृथ्वीची भौगोलिक माहिती त्यामध्ये समाविष्ट केलेली असते.

तुझ्या शिक्षकांच्या/वडीलधाऱ्यांच्या मदतीने नकाशाचे उपयोग शिकून घे.

कृती : एका लहान गावचा आदर्श नकाशा खाली दिलेला आहे. तुझ्या शिक्षकांच्या/वडीलधाऱ्यांच्या सहकार्याने बाजूला दिलेल्या अनुक्रमणिकेमध्ये त्यातील चिन्हे आणि तपशील लिही.






अनुक्रमणिका	
चिन्हे	**तपशील**

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

जोड्या जुळव.

चिन्हे	तपशील
	नदी
	घर
	झाड
	सूर्य
	टेकड्या
	चंद्र
	मनुष्य

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 25

माझा जिल्हा - तुझा जिल्हा

I5H3F5

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- आपल्या जिल्ह्याची ओळख करुन घेशील.


चित्र बघ. हे मल्लेपूर गाव आहे. येथे अनेक घरे आहेत.





मल्लेपूर हे चन्नरायपट्टण या प्रभागामधील एक गाव आहे. या प्रभागामध्ये मल्लेपूर सारखी अनेक गांवे आहेत.

येथे एका प्रभागाचे चित्र दिले आहे. अनेक प्रभाग एकत्र येऊन तालुका बनतो.



NOT TO BE REPUBLISHED

जर तू एका गावात रहात असशील तर तुझे गाव कोणत्या प्रभागात आणि तालुक्यात येते हे जाणून घे. जर नसेल तर तुला माहीत असलेल्या एका गावचे नाव घेऊन ते कोणत्या प्रभागात येते तसेच कोणत्या तालुक्यात येते त्यांची नावे लिही.

गाव	प्रभाग	तालुका

तुझ्या तालुक्यातील प्रभागांची यादी कर आणि तुझ्या वर्गात लाव.

एका तालुक्यात अनेक प्रभाग असतात हे तुला माहीत आहे. खालील नकाशाचे निरीक्षण कर.



अनेक तालुक्यांच्या समुहाला जिल्हा म्हणतात. वर दिलेल्या नकाशातील जिल्हा कोणता ते सांगा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कुछ तालूकों के समूह को जिला कहते हैं। चित्र में दिया गया नक्शा कौन से जिले का है बताओ।

कुछ जिलों को मिलाकर राज्य बनता है। हमारे राज्य कर्नाटक में कितने जिले हैं ? क्या तुम जानते हो ? कर्नाटक का नक्शा देखो। यहाँ दिखाए गए जिलों की सूची बनाओ। कुल कितने जिले है देखकर बताओ।



अ. नं.	जिल्ह्यांचे नाव

अ. नं.	जिल्ह्यांचे नाव

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

कर्नाटक राज्यातील एकूण जिल्ह्यांची संख्या _____

तुझ्या जिल्ह्याचे नाव _____

तुझ्या जिल्ह्यातील तालुके _____ _____

_____ _____

_____ _____

_____ _____

_____ _____

_____ _____

_____ _____


आपल्या राज्याचा नकाशा बघ. राज्याच्या उत्तर टोकाला व दक्षिण टोकाला कोणते जिल्हे आहेत ते सांग.

कृती : तुझ्या जिल्ह्याच्या सभोवती असणाऱ्या जिल्ह्यांची नावे खाली दिलेल्या तक्त्यात लिही.

दिशा	जिल्ह्याचे नाव
पूर्व	
पश्चिम	
उत्तर	
दक्षिण	
आग्नेय	
नैऋत्य	
वायव्य	
ईशान्य	

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आपल्या राज्यात आढळणाऱ्या प्राणी आणि पक्षी यांची चित्रे खाली दिलेली आहेत. त्यांचे निरीक्षण कर.




कृती : तुझ्या जिल्ह्यात आढळणाऱ्या प्राणी आणि पक्ष्यांची यादी तयार कर.

प्राणी	पक्षी

NOT TO BE REPUBLISHED

नाचणा, जोंधळा, गहू, ऊस, नारळ, सुपारी, कडधान्ये, तेलबिया, इत्यादींचे उत्पादन आपल्या राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात होते.













© BALBHARATI PUNE. NOT TO BE REPUBLISHED














कृती : तुझ्या जिल्ह्यातील प्रमुख पिकांची यादी कर.

_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____

NOT TO BE REPUBLISHED

आपल्या राज्यात साखर, सिमेंट, खते, विमान बांधणी, धागे तयार करणे, कागद, लोखंड इत्यादी अनेक कारखाने वेगवेगळ्या जिल्ह्यांत आढळतात.







@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती : तुझ्या जिल्ह्यातील प्रमुख पिकांची यादी कर.

_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____

कृती : तुझ्या जिल्ह्यात आढळणाऱ्या कारखान्यांची यादी कर.

आपल्या राज्यातील जिल्ह्यांमध्ये शेती, मासेमारी, कापड तयार करणे, बुट्ट्या विणणे, कुंभारकाम इत्यादी वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय आढळतात.










@KTP BE RE






© @KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती : तुझे शिक्षक/वडीलधाऱ्यांच्या सहाय्याने तुझ्याजिल्ह्यातील प्रमुख व्यवसायांची यादी कर.

_____ _____ _____

_____ _____ _____

आपल्या राज्यात भीमा, कृष्णा, तुंगभद्रा, नेत्रावती आणी कावेरी या प्रमुख नद्या आहेत.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती : तुझ्या जिल्ह्यातून वाहणाऱ्या प्रमुख नद्यांची नावे लिही.

_____

_____

_____



_____

_____

खाली दिलेली चित्रे ही आपल्या राज्यातील प्रेक्षणीय स्थळांमधील विशेष प्रसिद्ध ठिकाणे दर्शवितात. उदा : हंपी येथील दगडी रथ, विजयापूर येथील गोलघुमट, मैसूरुचा राजवाडा, बेंगळूरु येथील विधान सौध, शिवमोग्गा येथील जोगचा धबधबा, मंड्या येथील कोक्करु बेल्लूरु पक्षी अभयारण्य. ही स्थळे जिल्ह्यांचे वैशिष्ट दर्शवितात. प्रत्येक जिल्ह्यात प्रसिद्ध स्थळे असतात.





कृती :

- तुझ्या जिल्ह्यातील प्रसिद्ध स्थळांची नावे लिही.

  _____,_____, _____, _____, _____.

  ही प्रसिद्ध का आहेत? माहीत करुन घे.

- तुझ्या जिल्ह्यातील प्रसिद्ध किंवा प्रेक्षणीय स्थळांची चित्रे जमा कर आणि येथे चिकटव.

प्रत्येक जिल्हा आपल्या राज्याचा एक अव्दितीय भाग आहे. प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळे हवामान, पिके, उद्योगधंदे, व्यवसाय आणि प्रेक्षणीय स्थळे आढळतात. तुझ्या जिल्ह्याची सर्व माहिती करुन घे. इतर जिल्हे बघण्यास जा आणि त्यांची अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न कर.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED